# 2020 21



पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ८ मार्च २०२१

## 'सेल्फ डिफेन्स' विषयावर 'विवेकानंद'मध्ये कार्यशाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

विवेकानंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिमखाना व एनसीसी विभागातर्फे महिला व मुलींसाठी सेल्फ डिफेन्स विषयावर कार्यशाळा झाली.

इनरव्हील क्लब ऑफ कोल्हापूरच्या रितू वायचळ प्रमुख वक्त्या होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शिल्पा भोसले होत्या. याप्रसंगी मुलींना छेडछाड झाल्यास कसा प्रतिकार करायचा याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्याचबरोबर महिलांना व मुलींना स्वसंरक्षणाविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

प्रास्ताविक प्रा. किरण पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गीतांजली साळुंखे यांनी केले. प्रा. सहिदा कच्छी यांनी आभार मानले. यावेळी कॅप्टन सुनिता भोसले, डॉ. नीता पाटील, प्रा. जे. आर. भरमगोंडा, अर्चना बराले, गीतांजली ठोमके व विद्यार्थी, सर्व प्राध्यापक व महाविद्यालयातील कर्मचारी उपस्थित होत्या.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ८ मार्च २०२१

## 'विवेकानंद'च्या खेळाडूंची राष्ट्रीय मैदानी स्पर्धेसाठी निवड

INTERNATIONAL YOGA DAY



पुढारी

मंगळवार, २२ जून २०२१

# विवेकानंद महाविद्यालयात योगा प्रशिक्षण शिबिर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. 'योगा फॉर वेल बीईंग'नुसार योग दिन साजरा करण्यात आला.

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते योग शिबिराचे उद्घाटन झाले. याप्रसंगी मेजर गुणा मालती यांनी मनोगत व्यक्त केले. योग साधक प्रा. डॉ मिलिंद कारंजकर, योगगुरू आशा पाटील यांनी एनसीसी छात्रांना व एनएसएस स्वयंसेवकांना योगासनाचे धडे दिले. प्रास्ताविक तेजश्री सगावकर यांनी केले. सिद्धार्थ पाटील यांनी आभार मानले.

पुण्य नगरी

मंगळवार, २२ जून २०२१

## विवेकानंद महाविद्यालय

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयात ७ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योग प्रशिक्षणाचे आयोजन केले होते. 'योगा फॉर वेल बीईंग' मथळ्याखाली योग दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी योग शिबिराचे उद्घाटन केले. प्रमुख अतिथी मेजर गुणा मालती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. योग साधक प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर आणि योगगुरू आशा पाटील यांनी एनसीसी छात्रांना व एनएसएस स्वयंसेवकांना योगासनाचे धडे दिले. प्रास्ताविक तेजश्री सगावकर आणि आभार सिद्धार्थ पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे नियोजन कॅप्टन सुनीता भोसले, लेफ्टनंट जितेंद्र भरमगोंडा, प्रा. एच. पी. पाटील, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डी. एम. पन्हाळकर आणि आर्या जोशी यांनी केले.

INTERNATIONAL YOGA DAY



पुण्य नगरी बुधवार, ३ फेब्रुवारी २०२१

## विवेकानंद महाविद्यालयास बिगेडियर आर. के. सिंग यांची भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालय येथे सुरू असलेल्या दहा दिवसीय एनसीसी प्रशिक्षण शिबिरास कोल्हापूर एनसीसी विभागाचे ग्रुप कमांडर बिग्रेडियर आर. के. सिंग यांनी भेट दिली. अध्यक्षस्थानी प्राचार्य आर. आर. कुंभार होते. यानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे प्रास्ताविक कर्नल आर. बी. होला यांनी केले. या शिबिरासाठी कोल्हापूर शहरातील पाच कॉलेजमधून १०० कॅडेटस्‌नी सहभाग घेतला आहे. यावेळी आर. के. सिंग म्हणाले, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गतवर्षापासून थांबलेली एनसीसी प्रशिक्षणाची प्रक्रिया दहा दिवसीय केडरच्या माध्यमातून सुरू केली आहे. या केडरमध्ये एनसीसी कॅडेटस्‌ना भरतीपूर्व मिलिटरी प्रशिक्षण दिले जाते. कार्यक्रमास लेफ्टनंट कर्नल सुनील कुमार, ट्रेनिंग ऑफिसर कोल्हापूर एनसीसी ग्रुप, कॅप्टन सुनीता भोसले, एनसीसी छात्र उपस्थित होते.

pun

OPPORTUNITIES IN INDIAN ARMY

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, ११ फेब्रुवारी २०२१ ८

# छात्रसैनिकांनी नवा देश घडविण्यासाठी योगदान द्यावे

## सुरेश पाटील; 'विवेकानंद'मध्ये छात्रसैनिकांशी संवाद



सुरेश पाटील

कोल्हापूर, ता. १० : देशावर खरं प्रेम असेल तो स्वयंशिस्त पाळतोच. • छात्रसैनिकांनीही देशावर प्रेम करावे आणि वाढती लोकसंख्या व गरजा

यामुळे होणारा नैसर्गिक स्रोतांचा ऱ्हास रोखण्यासाठी लोकसहभागातून उपक्रम राबवत नवा देश घडविण्यामध्ये योगदान द्यावे, असे आवाहन 'ग्रीन वॉरियर' अशी ओळख असणाऱ्या निवृत्त लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील यांनी केले. स्वामी विवेकानंद महाविद्यालयात एनसीसीच्या छात्रसैनिकांशी संवाद साधताना ते बोलत होते. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि 'एनसीसी'च्या ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा, सहयोगी एनसीसी अधिकारी कॅप्टन सुनीता भोसले व लेफ्टनंट जे. भरमगोंडा यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम झाला. त्यात विवेकानंद महाविद्यालय, महावीर महाविद्यालय, न्यू कॉलेज, डॉ. रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स आदी महाविद्यालयातील एनसीसी युनिट्सचे अडीचशेहून अधिक छात्रसैनिक सहभागी झाले.

लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील यांचा प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एम. रूईकर यांच्या हस्ते तर प्रजासत्ताक दिन संचलनात सहभागी होऊन परतलेला छात्रसैनिक रामचंद्र अशोक चव्हाण याचा लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. कॅप्टन प्रशांत पाटील, लेफ्टनंट आर. एस. नाईक, लेफ्टनंट के. डी. तिऊरवाडे, सुभेदार अल्ताफ पेंढारी आदी उपस्थित होते. सिनीअर अंडर ऑफिसर केतकी सहस्त्रबुद्धे, कॅडेट तेजस्विनी सांगावकर, श्रुती बाम व सिद्धार्थ पाटील यांनी संयोजन केले.

GREEN THUMB MOVEMENT